# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 10/08/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 09/08/2021 चे 14.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला आरोपी नामे– नेहाल महादेव ईटनकर, वय 25 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, कुही, ता. कुही, जि. नागपूर याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक शुभांगी तकीत 8766934595 या करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा सिल्लोरी येथे दिनांक 08/08/2021 चे 22.00 वा. ते दिनांक 09/08/2021 चे 08.00 वा. दरम्यान गं.भा.पार्वतीबाई माणिक कोवाची(मृतक) वय 62 वर्ष रा. सिल्लोरी हि मागील 40 वर्षापासुन मनोरूग्ण होती. तीने पागलपणाचे भरात घरून निघुन जावुन शिवारातील विहीरीचे पाण्यात उडी मारून पाण्यात बुडुन मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद माणिक कोवाची, वय 35 वर्ष, रा. सिल्लोरी, ता.सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नागरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– मृतक नामे– दिगांबर भाउराव चांदुरकर वय 39 वर्ष रा.खुमारी पोष्ट मोहपा हे पुर्ति कंपनी धापेवाडा येथे हेल्पर म्हणुन पार्किंगचे काम करीत होते. मौजा पुर्ति कंपनी मधील सीयान ॲग्रो इंडस्ट्रीज डिटरजन युनिट कंपनी धापेवाडा बु येथे दिनांक 09/08/2021 चे 17.00 वा. दरम्यान ते ईलेक्ट्रीक मशिनवर काम करीत असतांना त्यांना मशिनचा करंट लागला व ते खाली पडले. फिर्यादी यांनी त्यांना कंपनीच्या गाडी मध्ये डॉ पोतदार हॉस्पीटल कळमेश्वर यांचेकडे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मिलींद भालचंद्र कुलकर्णी, वय 49 वर्ष, रा. वानाडोंगरी हिंगना यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नागरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर